# साय-फाय करंडकाची महाअंतिम फेरी १६ डिसेंबरला

**पुणे** : वेगाने वाढणारे सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षिततेची गरज, याबाबत एकांकिकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. त्यासाठी क्विक हिल फाउंडेशनने महाराष्ट्र सायबर आणि थिएटर अकादमीतर्फे 'साय-फाय करंडक २०१८' ही एकपात्री स्पर्धा आयोजित केली आहे. दुसऱ्या साय-फाय करंडकाची महाअंतिम फेरी १६ डिसेंबरला होणार आहे. 'महाराष्ट्र सायबर'चे पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, थिएटर



साय-फाय करंडक २०१८ या स्पर्धेच्या चषकाचे अनावरण नुकतेच करण्यात आले.

अकादमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे व क्विक हिल टेक्नोलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी साय-फाय करंडक २०१८ या स्पर्धेच्या चषकाचे अनावरण करण्यात आले. या स्पर्धेसाठी १०० हून अधिक संघांनी प्रवेशिका पाठविल्या होत्या. थिएटर अकादमीने अध्यक्ष व नाट्य कलाकार प्रसाद पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर येथे विभागीय चाचण्या घेतल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रितेश देशमुख आहेत. अभिनेता आनंद इंगळे आणि विजय केंकरे करंडकाच्या अंतिम फेरीचे परीक्षक म्हणून काम पाहणार आहेत.